# Washim District Police

**Nature of Work** :- **Handling communal/ caste tensions**

**Police Station** :- **Washim Police**

**Date of Good Work done** :- **18/01/2023**

**Brief of the work done :-**

शिरपूर प्रकरणातील आरोपी पोलिसांच्या ताब्यात ; वैयक्तिक वादातून फेक अकाउंटद्वारे आक्षेपार्ह पोस्ट केल्याचे निष्पन्न.

# जातीयतेढ निर्माण करणारा मुख्य सुत्रधार गजाआड

## शिरपूर येथील प्रकरण; समाजमाध्यमांचा गैरवापर अंगलट

वाशीम, दि. १७ (प्रतिनिधी)

**मालेगाव तालुक्यातल शिरपूर येथील एका व्यक्तीने विशिष्ट समाजाच्या व्यक्तिच्या नावाने समाज माध्यमांवर खाते उघडून जातीय तेढ निर्माण केले. सोशल माध्यमावर विशिष्ट समाजाच्या भावना भडकतील असा मजकूर प्रसारित झाल्यानंतर मालेगाव तालुक्यातील शिरपूर येथे जनाआक्रोश निर्माण झाला. त्याचे पडसाद रिसोड, मालेगाव, वाशीमसह जिल्ह्यात उमटले. कोठे बंद तर कोठे मोर्चे निघाले. मात्र, पोलिसांनी या घटने मागील सुत्रधारास गजाआड केल्याने हे प्रकरण आता निवळले आहे. वैयक्तिक रागातून आक्षेपार्ह्य लिखान प्रसारित करुन दोन धर्मात तेढ निर्माण करणाऱ्या आरोपीचे नाव मंगेश इंगोले असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.**



या संदर्भात अधिक माहिती देताना बच्चन सिंह म्हणाले की, शिरपूर येथे तीन दिवसांपूर्वी एका विशिष्ट धर्माच्या व्यक्तिच्या नावाने इन्स्टाग्राम या समाजमाध्यमावर दुसऱ्या धर्माच्या एका समाजाबद्दल अत्यंत आक्षेपार्ह्य मजकूर प्रसारित करण्यात आला होता. याचे पडसाद शिरपूरात उमटल्याने प्रचंड जमाव पोलीस ठाण्यात जमा झाला होता. मात्र, यावेळी पोलीस शिरपूरातील परिस्थिती हाताळण्यास अपयशी ठरल्याने जमावाने काही ठिकाणी तोडफोडही केली होती. या प्रकरणाने संपूर्ण जिल्ह्यातच प्रचंड तणाव निर्माण झाला होता. शिरपूर पोलिसांच्या लेटलतीफशाहीने आरोपीला बळ मिळून त्याने पुन्हा त्याच खात्यावरुन आक्षेपार्ह्य मजकूर प्रसारित करुन आगीत तेल ओतण्याचे काम केले होते. याला काही संघटनांनी धार्मिक रंग देण्याचा प्रयत्न केला. जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांनी कसून तपास करण्याच्या सुचना दिल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखा व सायबर शाखेने संबंधित समाजमाध्यमांवरील खात्याचा कसून शोध घेतला असता अनेक धक्कादायक बाबी तपासात समोर आल्या. सदर समाजमाध्यमावरील खाते हे मंगेश राजु इंगोले रा. शिरपूर याचे असल्याचे निष्पन्न झाले. त्यानेच सदर मजकूर प्रसारित केल्याची बाब निदर्शनास आली तसेच सदर मजकूर प्रसारित केल्यानंतर जनभावना भडकाविण्याच्या उद्देशाने व धार्मिक विव्देश पसरविण्याच्या उद्देशाने गावात फिरून प्रत्येकाला सदर आक्षेपार्ह्य मजकूर दाखविला. विशेष म्हणजे जमावासोबत पोलीस ठाण्यात जावून पोलीस काय कारवाई करतात. याची पाहणी केली. एवढे मोठे प्रकरण घडून वातावरण तणावपूर्ण झाले असताना शिरपूर पोलिसांची तपासातील ढिलाई सदर आरोपीला पुन्हा समाजमाध्यमावर मजकूर प्रसारित करण्यास कारणीभूत ठरली. त्यानंतर संपूर्ण जिल्ह्यात या प्रकरणाचा तणाव पसरला मालेगाव, रिसोड, शिरपूर येथे बंद पाळून मोर्चा काढण्यात आला. तर मंगळवारी अनसिंग व वाशीम बाजारपेठही बंदचे आवाहन करण्यात येवून मोर्चा काढण्यात आला. मात्र, त्याच वेळी पोलिसांनी आरोपी अटक केल्याचे जाहिर केल्यानंतर जिल्ह्यातील तणाव निवळला. दरम्यान, समाजकंटक धार्मिक व जातीय तेढ निर्माण करण्याच्या दृष्टीने अनेकवेळा समाजमाध्यमांचा गैरवापर करतात. जनतेने समाजमाध्यमांवरील अशा पोस्टवर डोळे झाकून विश्वास करु नये. तसेच धार्मिक विव्देश पसरविणाऱ्या लिखानापासून सावध रहावे, तसेच आढळून आल्यास जवळच्या पोलीस ठाण्याचा संपर्क साधून सामाजिक सलोखा कायम राखण्यास मदत करण्याचे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांनी याप्रसंगी केले.